# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

# वेळ-संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-07.09.2026** **वार- सोमवार**

---

**<u>जिल्हा परिषद सदस्य</u>**

राज्यातल्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांमध्ये नियुक्त केल्या जाणाऱ्या स्वीकृत सदस्यपदी डॉक्टर, वकील, अभियंते, शिक्षणतज्ज्ञ, समाजसेवकांना संधी दिली जाणार आहे. राज्याच्या ग्रामविकास विभागानं याबाबतच्या पात्रतेच्या अटी निश्चित केल्या असून, ही पात्रता धारण करणाऱ्या व्यक्तींचीच स्वीकृत सदस्यपदी नियुक्ती करण्याचा आदेश दिला आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमधल्या एकूण सदस्य संख्येच्या किमान 10 टक्के किंवा जिल्हा परिषदांमध्ये किमान पाच आणि पंचायत समित्यांमध्ये किमान एक स्वीकृत सदस्य नियुक्त करण्यात येणार आहे.

**<u>मध्यस्थी जनजागृती</u>**

न्यायप्रक्रियेकडे केवळ विजय किंवा पराभवाच्या दृष्टिकोनातून न पाहता पक्षकारांचं म्हणणं समजून घेणं, त्यांच्या भावना जाणून घेणं आणि संवादाच्या माध्यमातून मतभेद दूर करण्याचा प्रयत्न करणं आवश्यक आहे असं मत प्रमुख जिल्हा आणि सत्र न्यायाधीश अंजू ए. एस. शेंडे यांनी व्यक्त केलं. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि पुणे बार असोसिएशननं आयोजित केलेल्या मध्यस्थी जनजागृती कार्यक्रमात त्या आज बोलत होत्या. निवृत्त न्यायाधीश शिरीषकुमार हाडे यांनी यावेळी मध्यस्थी प्रक्रियेची कार्यपद्धती, मध्यस्थाची भूमिका आणि मध्यस्थी प्रक्रियेचं महत्त्व याबाबत मार्गदर्शन केलं.

**<u>कामगार कायदे</u>**

पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि आजीविका ब्युरो यांनी आज नवीन कामगार संहितेबाबत कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. यावेळी तज्ज्ञांनी नवीन कामगार संहितेतील तरतूदी, कामगारांचे हक्क आणि कायदेशीर संरक्षण याबाबत कामगारांना मार्गदर्शन केलं. तसंच कामगारांसाठी विधी सेवा प्राधिकरणाकडून दिल्या जाणाऱ्या मोफत कायदेविषयक सेवा, मार्गदर्शन आणि विविध शासकीय योजनांची माहिती दिली.

**<u>उमाजी नाईक अभिवादन</u>**

ब्रिटिश सत्तेविरुद्ध 14 वर्षे संघर्ष करणारे राज्यातले आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त आज नवी दिल्लीतल्या महाराष्ट्र सदनात आणि मुंबईत मंत्रालयात अभिवादन करण्यात आलं. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी आणि प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर यांनी राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**<u>मोर्चा</u>**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधल्या कथित गैरप्रकाराविरोधात आज पुण्यात विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. या मोर्चात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार,

काँग्रेसचे आमदार विश्वजित कदम सहभागी झाले होते. दरम्यान, या आंदोलनाआड विरोधक राजकारण करत असल्याचा आरोप भाजपाचे नवनाथ बन यांनी केला आहे.

**ईकचरा**

पुणे शहरातल्या वाढत्या ई-कचऱ्याच्या समस्येवर उपाय म्हणून महापालिका स्वतंत्र व्यवस्थापन प्रणाली उभारणार आहे. या प्रणालीअंतर्गत संकलन केंद्र, वाहतूक व्यवस्था आणि अधिकृत पुनर्वापर यंत्रणा उभारण्यासाठी प्रस्ताव मागवले जाणार आहेत.

**रक्तपेढ्या**

पुणे शहरातल्या रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा साठा निम्म्यावर आल्यामुळे रक्ताचा तुटवडा भासत आहे. हा तुटवडा दूर करण्यासाठी नागरिकांनी आणि नियमित रक्तदात्यांनी मोठ्या संख्येनं स्वेच्छेनं रक्तदान करावं, असं आवाहन आरोग्य विभागानं केलं आहे. दरम्यान, बदलत्या हवामानामुळे डेंग्यूच्या रुग्णांची संख्या वाढली असून प्लेटलेट्सची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे.

**साक्षरतदिन**

आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त उद्या पुणे जिल्ह्यात डीअर- ड्रॉप एव्हरीथिंग अँड रीड अर्थात 'सर्व कामे बाजूला ठेवून वाचन करा' हा सामूहिक वाचन उपक्रम आयोजित केला जाणार आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या या उपक्रमात विद्यार्थी, शिक्षक, पालक, शिक्षण विभागातले अधिकारी सुमारे अर्धा तास सामुहिकरीत्या वाचन करणार आहेत.

**पुरस्कार**

ज्येष्ठ गणितज्ञ आणि भारतीय ज्ञान परंपरा विषयाचे अभ्यासक श्रीराम चौथाईवाले यांच्या हस्ते आज पुण्यात माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी विद्यालयात गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमात प्रशांत जाधव, मनाली मांडके आणि वरदा पटवर्धन यांचा गौरव करण्यात आला.

**कारवाई**

दहीहंडी उत्सवादरम्यान ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन केलेल्या मंडळांवर पुणे पोलिसांकडून कारवाई केली जाणार आहे. ध्वनी पातळीच्या मर्यादेचं उल्लंघन करत निर्धारित डेसिबलपेक्षा अधिक आवाज करणाऱ्या मंडळांवर गुन्हे दाखल केले जाणार आहेत.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल 30 आणि किमान 21 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्या दुपारनंतर पावसाच्या हलक्या सरी पडतील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.**